अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# भक्तिपिठाचे जगद्गुरु संत तुकाराम

*आम्ही वैकुंठवासी। आलो याचि कारणासी।*
*बोलिले जे ऋषी। साच भावे वर्तावया।*
*पिटू भक्तीचा डांगोरा। कळिकाळासी दरारा।*
*तुका म्हणे करा। जयजयकार आनंदे।।*

आपल्या अभंगाप्रमाणे ज्याचा जीवनव्यवहारही अभंग राहिला. त्या तुकाराम महाराजांनी ३६४ वर्षांपूर्वी सदेह वैकुंठगमन केले. आज तुकाराम बीज देहू तीर्थक्षेत्रामध्ये तुकोबारायांनी सांगितलेल्या उपदेशाप्रमाणे आनंदाचाच जयजयकार होत आहे आज ते वैकुंठवासी असलो तरी ज्या कारणासाठी आले होते ते पूर्ण करुन तुकोबांनी या जगाचा निरोप घेतला त्यांनी अवघ्या महाराष्ट्रात भक्तीचा असा काही डांगोरा पिटला की खरोखरच कळीकाळाला त्यांचा धाक वाटला असावा. आदर वाटला असावा आणि म्हणूनच त्यांच्यासाठी भगवंताला सदेह वैकुंठगमनाची सोय करावी लागली असावी. आजही त्यांच्यामागे हाच भक्तीचा डांगोरा सर्वदूर पिटला जातो. महाराष्ट्राच्या भागवत धर्माची पताका म्हणजेच तुकाराम महाराजांच्या भक्तीचा डांगोरा आहे. त्यांच्या अभंगातल्या प्रत्येक शब्दाला सत्याची आणि अनुभव कथनाची जोड आहे. त्या आत्मानुभूतीमुळेच ते स्वत: आनंदरुप तर झालेच परंतु प्रत्येक भगवद्भक्ताला या आनंदाचे वाटेकरी करून घेण्याची किमया त्यांनी साधली. याच आनंदाचा प्रत्यक्ष अनुभव प्रत्येक वारकरी नित्यनेमाने घेतो. आषाढी कार्तिकीच्या निमित्ताने तर तो आनंदाचे डोही तरंगत असतोच. परंतु देहू आळंदीला जाणाऱ्या कोणाही भक्ताला आनंदाच्या तरंगामध्ये रंगून जाता येते. याचे अतिशय सुरेख वर्णन तुकोबांनी केले आहे.

*आनंदाचे डोही आनंद तरंग*
*आनंदची अंग आनंदची रंग*
*काय सांगो जाले काहीचिया नाही*
*पुढे चाली नाही आवडीने।*

## आनंदाचे तरंग

एक गोष्ट तर सगळ्यांनीच नीट लक्षात घ्यायला हवी. जग कितीही पुढारले माहिती तंत्रज्ञान तुमच्या खिशात येऊन बसले तरी भक्तिचे ज्ञान काळजात जाणून ठेवण्याशिवाय पर्याय नाही कारण जे संस्कार तुकोबा आपल्या अभंगातून देतात ते कोणतेही तंत्रज्ञान देऊ शकत नाही. एका ठिकाणी ते म्हणतात की

*जोडीली अक्षरे। नव्हती बुध्दीची उत्तरे।*
*नाही केली आटी। काही मानदंभासाठी।*
*कोणी भाग्यवंत। तया कळेल उचित।*
*तुका म्हणे झरा। आहे मुळीचाची खरा।*

तुकारामांनी लौकिक शिक्षण घेतले नव्हते. तरीही ते अशी अलौकिक तत्त्व सहजपणे मांडू शकले. ते इतक्या विनयशीलतेनेसांगतात की, मी जी अक्षरे जोडली त्यातून भगवद्भक्तीचाच विचार मांडला. सामान्य लोकांना समजवून देण्याचा त्यामागे हेतू होता. ती अक्षरेच भक्तीची मुळाक्षरे होती. तो श्रीगणेशा महाराष्ट्रामध्ये भागवतधर्माचा पाया रचणारा ठरला. म्हणूनच आज तुकोबांचे स्मरण करताना भारतासारख्या भक्तिपिठाने जगाला एक मोठी तात्त्विक देणगी दिली आहे असे म्हणता येते. म्हटले तर तुकोबा संत आहेत. म्हटले तर तुकोबा समाजसुधारक आहेत. म्हटले तर तुकोबा प्रापंचिक आहेत. म्हटले तर तुकोबा व्यावहारिक आहेत. तुकोबा कवी आहेत. तुकोबा साहित्यिक आहेत. एवढे सगळे असूनही तुकोबा तुमच्या आमच्यासारखे सामान्य आहेत. ज्यावेळी एखाद्या व्यक्तीत अशा प्रकारचे असामान्यत्व असूनही जो सामान्यांप्रमाणे वागतो तोच संत होऊ शकतो. विशेषत: तुकोबांनी महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे प्रतिनिधीत्व केले बहुजन समाजात विठ्ठलभक्तीला त्यांनी अनन्यसाधारण असे अधिष्ठान प्राप्त करुन दिले. पंढरपूरला जाणारा वारकरी देहूला जातो. विठ्ठलाचे रुप डोळा भरून पाहणारा भक्त देहूला येऊन त्यांच्या सदेह वैकुंठ गमनाचे चरित्र पुन्हा पुन्हा आठवतो. दया, क्षमा, शांती तेथे देवाची वसती, देहूचा हा देव म्हणजेच तुकोबाराय. त्यांच्यापुढे विनम्र भावनेने नतमस्तक होण्यात समस्त विठ्ठलभक्त स्वत:ला धन्य समजत असतो. अशा सर्वगुणसंपन्न तुकोबांच्या जयंतीचे निमित्त त्यांच्या अभंग संस्कारांचे सगुणरुप प्रत्येकाने आपल्या मनावर गोंदवून घेतले पाहिजे.

*गर्भाचे आवडी मातेचा डोहळा।*
*तेथीचा जिव्हाळा तेथे बिंबे।*
*तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा।*
*अनुभव सरिसा मुखआ आला।*

याच सर्वश्रेष्ठ अनुभवाचा ठसा त्यांना स्वत:बाबत जाणवला कारण विठ्ठलभक्तीचा सोहळा मातेच्या डोहाळ्याप्रमाणे असतो. अशा प्रकारची विठ्ठल सरमता त्यांना प्राप्त झाली. आज देहूमध्ये आलेला प्रत्येक भक्त केवळ नमस्कारासाठी तिथे जात नाही तर ज्यांनी जीवनतत्त्वांचे विवेचन केले ते तत्त्व आत्मसात करण्यासाठी जातात. त्या जगदगुरुंविषयी आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जातात. फार सोप्या शब्दात त्यांनी सामान्यातल्या सामान्य माणसाला स्वत:शीच बोलायला शिकवले, तुका म्हणे होय मनासी संवाद।आपुलाचि वाद आपणासी खरे सांगायचे तर तुकोबांची गाथा ही प्रत्येकाला आपणच आपल्याशी संवाद साधणारी गाथा वाटते.

## भक्तिचा तत्त्वविचार

आजच्या आधुनिक युगातही याच संतसंगतीचा किती उपयोग होऊ शकतो हे दरवर्षी निघणाऱ्या वारीतून लक्षात येते. अगदी उच्च विद्याविभूषित तरुणसुध्दा वारीकडे आकर्षित होत आहेत. भक्तिचा अध्यात्माचा अनुभव घेऊन मानसिक आनंदाचे वाटेकरी होत आहेत. जगाच्या इतिहासामध्ये जेवढे काही विचारवंत आणि तज्ज्ञ होऊन गेले त्यांनी मांडलेला जीवनविचार आणि आपल्या संतमहंतांनी भक्तिनिष्ठेतून सांगितलेली जीवननिष्ठा यामध्ये फार मोठा फरक दिसून येतो. जीवनाला अनुष्ठानाचे रुप देऊन आपल्या जगण्याचे विविध संदर्भ उलगडून दाखवण्याचे काम आपल्या संतमहंतांनी केले आहे आणि म्हणूनच या संतांनी सांगितलेला धर्म आजच्या काळात तर अधिक संयुक्तिक ठरतो.

*विष्णूमय जग वैष्णवांचा धर्म।*
*भेदाभेद भ्रम अमंगळ।*
*ऐका जी तुम्ही भक्त भागवत।*
*कराल ते हित सत्य करा।*
*कोणाही जीवाचा न घडावा मत्सर।*
*वर्म सर्वेश्वर पूजनाचे।*

एवढा मोठा तात्त्विक विचार सांगणारे तुकोबाराय या वैश्विक विद्यापीठाचे निश्चितच जगद्गुरु आहेत यात काही शंका नाही प्रश्न फक्त आज त्यांचे शिष्यत्व पत्करून तीच निष्ठा दाखवली पाहिजे. तरच या विश्वसंस्कृतीला आपण भक्तीचा अलंकार घालून अधिक आकर्षक केले असे म्हणता येईल. केवळ स्वार्थाचा बाजार मांडून कितीही पैसा अडका कमावला तरी त्याचे मोल होऊ शकत नाही. कारण संपूर्ण जीवनाचा तोल सांभाळण्याचे कार्य सरतेशेवटी अध्यात्मातूनच होऊ शकते. हे लक्षातच घ्यावे लागेल.